**<u>ठळक बातम्या</u>**

- पीएम धनधान्य कृषी योजना आणि डाळ उत्पादनात आत्मनिर्भरता मोहिमेसह ४२ हजार कोटी रुपये खर्चाच्या कृषी योजनांचा प्रधानमंत्र्यांच्या हस्ते प्रारंभ / अन्नधान्य उत्पादनात आत्मनिर्भरता हेच उद्दिष्ट असल्याचा प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केला निर्धार

- शेतकऱ्यांच्या मनातही स्वदेशीला प्राधान्य ही संकल्पना रुजत असल्याचं केंद्रीय कृषीमंत्र्यांचं प्रतिपादन

- राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती एकत्रच लढणार मात्र शक्य नसेल तिथं मैत्रीपूर्ण लढती होतील असे मुख्यमंत्र्यांचे संकेत

**आणि**

- वेस्ट इंडिजबरोबरच्या  दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताचा पहिला डाव ५ बाद ५१८ धावसंख्येवर घोषित. शतकी खेळी करत कर्णधार शुभमन गिलची विराट कोहलीच्या विक्रमाशी बरोबरी

**<><><><><>**

अन्नधान्य उत्पादनात भारताला आत्मनिर्भर करणं तसंच जागतिक बाजारासाठी उत्पादन करणं हे आपलं उद्दिष्ट असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. नवी दिल्लीत पीएम धनधान्य कृषी योजना आणि डाळ उत्पादनात आत्मनिर्भरता मोहिमेसह ४२ हजार कोटी रुपये खर्चाच्या कृषी योजनांचा प्रारंभ आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. प्रधानमंत्र्यांनी यावेळी कृषी, पशुसंवर्धन, मत्स्यपालन आणि अन्नप्रक्रिया क्षेत्रातल्या ५ हजार ४५० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचंही उद्घाटन केलं. शेतकरी कल्याण, कृषी स्वावलंबन आणि ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा बळकट करणं हे या योजनांचं उद्दिष्ट आहे.

देशात आज डाळीची आयात करावी लागते, त्यामुळे डाळ उत्पादनात आत्मनिर्भरता प्राप्त करण्यासाठी ही मोहीम राबवण्यात येणार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. देशातल्या ३५ लाख हेक्टर क्षेत्रावर डाळीचं उत्पादन करणं हे या मोहिमेचं उद्दिष्ट आहे. यात तूर, उडीद, मसुर डाळीचं उत्पादन वाढवलं जाईल, याचा फायदा दोन कोटी डाळ उत्पादकांना होईल, असं प्रधानमंत्री म्हणाले. धनधान्य योजनेत पशुधनावर लक्ष केंद्रित केल्यांचं प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट बाईट**

प्रशासनाने शेतकऱ्यांसोबत मिळून धनधान्य योजनेची अंमलबजावणी करावी असं आवाहन त्यांनी केलं.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी गेल्या अकरा वर्षात कृषी क्षेत्रात केलेल्या सुधारणांचा आढावा घेतला. या काळात अन्नधान्य उत्पादन ९०० लाख मेट्रिक टन वाढलं, फळभाज्या उत्पादन ६४० लाख मेट्रिक टनापेक्षा जास्त वाढलं, सहा मोठ्या खत उत्पादक कंपन्या उभ्या राहिल्या, मत्स्योत्पादन, मध उत्पादन दुप्पट झालं, कृषीमालाची निर्यात दुप्पट झाली असं प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितलं.

**केंद्रीय कृषीमंत्री** शिवराजसिंह चौहान यांनीही या कार्यक्रमाला संबोधित केलं. कृषी उपकरणांवर जीएसटी कमी केल्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असं कृषीमंत्री म्हणाले. रब्बी पिकांच्या हमीभावात सरकारने वाढ केली, प्रधानमंत्री किसान सम्मान निधी योजने अंतर्गत ३ लाख ९० हजार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरित झाला, असं त्यांनी सांगितलं. केंद्र सरकारच्या स्वदेशीच्या आवाहनाला शेतकरीही प्रतिसाद देत असून स्वदेशीची भावना त्यांच्यामधे रुजत आहे, असं चौहान म्हणाले.

**होल्ड बाईट चौहान**

**<><><><><>**

अतिवृष्टीचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानाबाबतची माहिती संकलित करण्यात येत आहे. त्याबाबतचे काम अंतिम टप्प्यात असून, निधीसाठीचा प्रस्ताव लवकरच केंद्र सरकारला पाठवण्यात येणार असून, दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत करण्यात येईल, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

पुण्यात राज्य कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेत झालेल्या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. सप्टेंबरमध्ये झालेल्या पावसामुळे मराठवाड्यात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. कृषी, महसूल विभागाकडून कर्मचारी माहिती संकलित करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. दिवाळीपूर्वी सर्व शेतकऱ्यांना मदत करण्यात येईल, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्ली रेल्वे स्थानकाला भेट देत नव्याने सुरु झालेल्या यात्री सुविधा केंद्राची पाहणी केली. या केंद्रामुळे रेल्वे स्थानक परिसरातली गर्दी कमी होऊन प्रवासही सुकर व्हायला मदत होईल असं ते म्हणाले. इथं पुरवलेल्या सुविधा आणखी ७६ रेल्वे स्थानकांवरही उपलब्ध करण्यात येतील असं वैष्णव यांनी सांगितलं. यामुळे सणासुदीच्या काळात प्रवाशांची गर्दी नियंत्रणात ठेवायला मदत होईल असं ते म्हणाले. आगामी, दिवाळी आणि छट पूजेनिमित्त विक्रमी संख्येनं विशेष रेल्वेगाड्या धावतील अशी माहिती  वैष्णव यांनी दिली.

**<><><><><>**

दिवाळी निमित्त होणारी गर्दी लक्षात घेऊन मुंबईहून छत्रपती संभाजीनगरमार्गे परभणी ते करीमनगर इथं जाणारी विशेष २२ डब्यांची वातानुकूलित रेल्वेगाडी सुरु करण्यात आली आहे. मनमाड, नगरसोल, छत्रपती संभाजीनगर, जालना, परतूर, सेलु, परभणी, पुर्णा, नांदेड, मुदखेड, धर्माबाद या स्थानकावर ही रेल्वे थांबणार आहे.

**<><><><><>**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती म्हणून लढणार आहोत, मात्र शक्य नसेल तिथं मैत्रीपूर्ण लढती होतील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाच्या उत्तर महाराष्ट्र विभागाची नियोजन बैठक नाशिकमधे झाली, त्यानंतर मुख्यमंत्री वार्ताहरांशी बोलत हो ते. यावेळी त्यांनी नाशिकसह धुळे, नंदुरबार, जळगाव आणि अहिल्यानगर जिल्ह्यातल्या राजकीय स्थितीचा आढावा घेतला. या निवडणुकीत भाजपाला चांगले यश मिळेल असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. दरम्यान, नाशिकमधल्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिसांना मोकळीक दिली असून गुन्हेगार कुठल्याही पक्षाशी संबंधित असला तरी गय केली जाणार नाही असं फडणवीस म्हणाले. या बैठकीला मंत्री पंकजा मुंडे, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, गिरीश महाजन, जयकुमार रावल, राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित होते.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीत आघाडीबाबतचा निर्णय स्थानिक पातळीवर घेतला जाईल, असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत सांगितलं.

दरम्यान, लातूर तसंच छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती आरक्षण सोडत परवा सोमवारी काढण्यात येणार आहे.

**<u>मविआ / हिंस / मनीषा</u>**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीचं शिष्टमंडळ येत्या मंगळवारी निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांची भेट घेणार आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे देखील या बैठकीस उपस्थित राहणार असल्याची माहिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी दिली. ते मुंबईत पत्रकारांशी बोलत होते.

**<><><><><>**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसंच लोकनायक जयप्रकाश नारायण आणि भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या जयंतीनिमित्त मान्यवरांनी त्यांना आदरांजली अर्पण केली आहे.

**<><><><><>**

नागपूर पोलीस आयुक्तालयाच्या ३३ व्या वार्षिक स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ काल पोलीस मुख्यालयात पार पडला. नागपूरचे पोलीस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांच्या हस्ते बक्षीसांचं वितरण झालं. या स्पर्धेत १८९ खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

**<><><><><>**

भारत आणि वेस्ट इंडिज क्रिकेट संघा दरम्यान नवी दिल्लीत सुरु असलेल्या दुसऱ्या कसोटी  सामन्याच्या दुसऱ्या दिवशी भारतानं आपला  पहिला डाव ५ बाद ५१८ धावसंख्येवर घोषित केला. कर्णधार शुभमन गिल १२९ धावांवर नाबाद राहिला. यासोबतच त्याने एका कॅलेंडर वर्षात पाच शतकं करण्याच्या विराट कोहलीच्या विक्रमाचीही बरोबरी केली. कालच्या २ बाद ३१८ धावसंख्येवरुन आपला पहिला डाव सुरु करणाऱ्या  भारतानं आपला तिसरा गडी झटपट गमावला. काल दिवसअखेर १७३ धावांवर नाबाद असलेला यशस्वी जयस्वाल अवघ्या २ धावा काढून धावबाद झाला. त्यानंतर मात्र कर्णधार शुभमन गिल आणि नितीशकुमार रेड्डीनं चौथ्या गड्यासाठी ९३ धावांची भागीदारी केली.

दरम्यान, आजच्या दिवसाचं शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा वेस्ट इंडिजनं भारताच्या मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करताना आपल्या पहिल्या डावात १ गडी बाद ४९ धावा केल्या होत्या.

**<><><><><>**

राज्यातल्या सर्व क्रीडा संकुलं, स्पोर्ट्स क्लब, जिमखाना, तसंच स्थानिक क्रीडांगणांवर महिला खेळाडूंसाठी पोषाख बदलण्यासाठी वेगळ्या खोलीची व्यवस्था करण्यात येणार आहे. क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती दिली. दिग्गज क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांनी यासंदर्भात केलेल्या आवाहनाला राज्य सरकारनं प्रतिसाद देत हा निर्णय घेतला आहे. या आवाहनाला तत्काळ प्रतिसाद देत महिलांसाठी सुविधा उपलब्ध करुन देणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य ठरलं आहे.

**<><><><><>**

राज्यात मान्सूनचा परतीचा प्रवास कालपासून सुरू झाला. राज्यात मान्सूनच्या परतीची सीमारेषा अलिबाग, अहिल्यानगर, आणि अकोला इथून जात आहे. पुढच्या तीन ते चार दिवसात राज्याच्या इतर भागातूनही मान्सूनच्या परतीसाठी परिस्थिती अनुकूल असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे.

**//<><><><><>//**